वाचलेः-१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मा.वि.पिंपरीनगर यांच्याकडील जा क्र.३६/२३ दि.०३/०४/२३ चे पत्र.
४) माध्य/शि/०१/कावि/१४८/२०२३ दि.२३/०३/२०२३
५) मावि/पिंन/०१/कावि/३६/२०२३ दि.०३/०४/२०२३
६) दि.१३/०४/२०२३ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/१९८ /२०२३
दि.१३/०४/२०२३

विषय –नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.

**श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक"**

**सं.क्र.५८७०**

आदेश,

श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.०६/०२/१९९१ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांची जन्म तारीख ०१/०६/१९६५ अशी असून त्यांच्या वयास दिनांक - ३१/०५/२०२३ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांना दि.३१/०५/२०२३ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानतुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांचे कडून महानगरपालिकेस नवीन घर कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांना माध्य/शि/०१/कावि/११९८/२००२ दि.३१/०७/२००२ अन्वये वेतन व निवृत्ती वेतन साठी सेवासातत्य देणेत आलेले आहे. तथापि श्री.भोसले बाळू पांडूरंग सहाय्यक शिक्षक यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कोषागरामध्ये भविष्य निर्वाह निधी वगळता कोणत्याही प्रकारे रक्कमा भरलेल्या नाहीत. त्यामुळे क्र.माध्य/शि/०१/कावि/१४८/२०२३ दि.२३/०३/२०२३ अन्वये श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांना ग्रॅच्युटी व इतर रक्कमेच्या पावत्या जमा करणेबाबत वाचले क्र.०४ अन्वये कळविलेले होते. त्याबाबत वाचले क्र.०५ अन्वये विद्यालयाने कळविलेले आहे, कि भविष्य निर्वाह निधी मनपा कोषागरात जमा केलेला आहे.त्याबाबतच्या पावत्या सादर करत आहे. या व्यतिरीक्त कोणत्याही रक्कमा भरलेल्या नाहीत.त्याबाबत श्री.भोसले बाळू पांडुरंग सहाय्यक शिक्षक यांची सेवानिवृत्ती करीता मनपा रूजु तारीख धरणेस कोणतीही तक्रार रहाणार नाही,तरी उपरोक्त बाबीचा विचार करता **श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांची सेवानिवृत्ती करीता मनपा मध्ये रूजु झालेली तारीख दि.०६/०२/१९९१ धरणेस मान्यता देणेत येत आहे.**

सबब,मी उप आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांना दिनांक - ३१/०५/२०२३ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.**

(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.भोसले बाळू पांडूरंग "सहाय्यक शिक्षक"
माध्यमिक विद्यालय पिंपरीनगर
प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपरीनगर
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.